# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/11/2022 (सोमवार) सकाळ

## चोरी

**१) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा नयाकुंड शिवार येथे दिनांक २६/११/२०२२ चे ०७.२० वा. ते ०८.५० वा. सुमारास यातील आरोपी क्र. १) उमेश पानतावणे, रा. कन्हान यांच्या मालकीचे धर्म काटयात आरोपी क्र. २) भागवत सोनबाजी निंबोने, रा. नयाकुंड, ३) हेमराज आत्माराम गजभिये, वय ४१ वर्ष, रा. खंडाळा डुमरी यांचे ताब्यात दगडी कोळसा अंदाजे ६० टन किंमती अंदाजे ०४,८०,०००/—रू. व शेल दगड अंदाजे २० टन, ०२ वजन काटे प्रत्येकी ५०००/—रू. प्रमाणे किंमती अंदाजे १०,०००/—रू., अंदाजे २०० किलो दगडी कोळसा किमती अंदाजे १६००/—रू., ०५ खाली बारदाने किंमती १००/—रू. असा एकुण ०४,९१,७००/—रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तसेच आरोपीतांनी सदरचा दगडी कोळसा डब्लु. सी. एल. मधुन खरेदी केले बाबत कोणतेही वैध कागदपत्र सादर केले नाही व आरोपी क्र. ०२) भागवत सोनबाजी निंबोने, रा. नयाकुंड याने सदरचा कोळसा डब्लु. सी. एल. मधुन चोरी करून आणल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पोलीस हवालदार प्रभाकर झोड, ब. नं. १६६५ पोस्टे. पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवने, पो. स्टे. पारशिवनी मो. क्र. ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा महादुला शिवार येथे दिनांक २५/११/२०२२ चे १८.०० वा. ते दि. २७/११/२०२२ चे १०.०० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे— सुनिल लक्ष्मण सहारे, वय ५३ वर्षे, रा. महादुला ता. पारशिवनी यातील यांचे शेतातील पराटीचे झाडांचे ६० किलो कापुस तसेच शेजारी शेतकरी सौ. हिरा मिलींद वासनिक हिचे शेतातील पराटीचे झाडांचे २०० किलो कापुस असा एकूण २६० किलो कापुस किंमती अंदाजे २३,४००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रभाकर झोड, ब. नं. पो. स्टे. पारशिवनी मो. क्र. 8208943874 हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**